## संपादकीय......

“नवज्योत” या त्रैमासिक आंतरविद्याशाखीय संशोधन पत्रिकेच्या प्रकाशन प्रवासातील २०२४ या सरत्या वर्षातील डिसेंबर महिन्याचा अंक हा विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक, अभ्यासक व वाचकांच्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे.

कोव्हिड-१९ च्या संकटानंतर रशिया-युक्रेन, अरब-इस्रायल युद्धाने संपूर्ण जगाच्याच अर्थव्यवस्था व शांततेला वेठीस धरले आहे. जगाला महामारीच्या धसक्यातून वाचविण्यासाठी शास्त्रज्ञ, तज्ज्ञ, संशोधक हे रात्रंदिवस त्यावरील लस, औषधे व मानसोपचार शोधण्यात गुंतले होते. आणि आज कसेबसे या महामारीतून जग सावरत असतानाच युद्धखोर प्रवृत्ती बळावल्या व त्यांनी शांततेलाच हात घातला. महामारी व युद्धांमुळे आज जवळपास सर्वच देशांच्या अर्थव्यवस्था पार मोडकळीस आलेल्या आहेत. त्यामुळे आज जवळपास सर्वच राष्ट्रांमध्ये एक भीती व आक्रोशाची विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्य व समाज व्यवस्थेची घडी आणि व्यक्तीची मनोअवस्था नीट होण्यासाठी नवनिर्माण, नवोन्मेषी सिद्धांत निर्मितीची नितांत गरज आहे. या कार्यासाठी शास्त्रशुद्ध संशोधनाद्वारे समस्यांचे निराकरण करण्यासाठी सामाजिक नैसर्गिक शास्त्रांबरोबरच सामाजिक शास्त्रांनी झटणे आवश्यक आहे. संशोधनाच्या माध्यमातून इतिहास,साहित्य व कलेबरोबरच वर्तमानात निर्माण झालेल्या सामाजिक, आर्थिक व सामाजिक समस्येचा विचार करून त्याद्वारेसिद्धांत निर्मिती आणि त्याचे उपयोजन होणे आवश्यक आहे. असे संशोधन व लिखाण करण्याची खरी जबाबदारी ही विशेषतत्वाने सामाजिक शास्त्रे व मानव्यविद्या शाखांची आहे. कोव्हिड-१९ ची जागतिक महामारी व रशिया-युक्रेन युद्ध, इस्रायल-हमास युद्धाच्या पार्श्वभूमीवर'नवज्योत'चा अंक प्रकाशित होत आहे. खरेतर आर्थिक व मानसिक शांतता भंग पावलेल्या या काळात आर्थिक स्थैर्य व देशाबरोबरच जागतिक शांततेची जबाबदारी संशोधनकर्त्यांवर येवून पडली आहे. प्रस्तुत'नवज्योत'या अंकाचा विशेष म्हणजे देशाबरोबरच जागतिक समुदायाच्या वर्तमान समस्या व प्रश्नांच्या संदर्भात ऐतिहासिक आणि समकालीन वस्तुनिष्ठ तथ्यांवर आधारीत शास्त्रशुद्ध पध्दतींचा अवलंब करून केलेले लिखाण होय. संशोधनकर्त्यांनी आपल्या शोधकार्यात विभिन्न विषय हाताळले आहेत.संशोधनकर्त्यांनी आपल्या विषयाची मांडणी वस्तुनिष्ठपणे करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.यामध्ये प्रामुख्याने'Economic Model of Disability: Implications andFuture Prospects of Disability-Inclusive India'या लेखामध्ये संशोधनकर्त्याने दिव्यांगांविषयी आर्थिक प्रारुप, त्याची एकप्रकारे अंमलबजावणी आणि भविष्यावर प्रकाश टाकला आहे.तसेच या लेखात दिव्यांगांच्या विषयी असणाऱ्या आर्थिक प्रारूपांच्या होणाऱ्या परिणामासंदर्भात आलेली मांडणी दिव्यांगांच्या प्रश्नांबाबत शोधकर्ते, लेखकांसह वाचकांच्या भावविश्वाला हात घालणारी आहे. ’Cultural Preservation through the Lens ofMadhubani Art: A Reflection of SubalternNarratives’ या लेखामध्ये संस्कृती आणि सबाल्टर्न याबाबत केलेले विवेचन हे अभ्यासकांसाठी अतिशय महत्त्वाचे आहे. याशिवाय भारत सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना ते महामारी कोव्हिड-१९ चे सामाजिक-राजकीय परिणाम इत्यादी विषयांवर झालेले मांडणी अभ्यासकांना विचारप्रवण करणारी आहे. अशा महत्त्वपूर्ण अंकाचे संपादकीय लिहिण्याबाबत माझ्यावर विश्वास दर्शविल्याबद्दल प्रकाशक, प्रा. डॉ. रवींद्र भणगे, प्राध्यापक राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांच्याप्रती मी कृतज्ञता व्यक्त करतो.

२०२४ च्या अखेरचा हा अंक महत्वाच्या समस्यांचे निराकरण करणारा व शोध क्षमता अधिकाधिक विकसित करणारा आहे. आंतरविद्याशाखीय व बहुभाषिक शोध पत्रिका असल्याने प्रस्तुत अंकात आलेले संशोधन लिखाण विविध शाखांशी आणि विषय पैलूंना हाताळणारे आहे. अतिशय व्यावहारिक बनलेल्या वातावरणात संशोधन करणाऱ्या शोधकांची सकारात्मक ऊर्जा टिकवून ठेवण्याचे कार्य प्रस्तुत संशोधन पत्रिका करीत आहे.या अंकातील सर्वच लेखांमधून राज्य व समाजातील इतिहास आणि समकालीन समस्या व प्रश्नांशी संबंधित अनेक कळीच्या विषयावर शोधपूर्ण मांडणी झालेली दिसून येते.संशोधनकर्त्यांच्या च्या अखंड व अविरत सुरू असलेल्या शोधकार्यामुळेच ‘नवज्योत'चा आजपर्यंतचा शोध प्रवास अर्थपूर्ण झाला आहे.
आपले मनस्वी धन्यवाद.....

डॉ. सुखदेव उंदरे
सहाय्यक प्राध्यापक
राज्यशास्त्र अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.